ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# चातुर्याम धर्म : धर्मानंद कोसंबी

* डॉ. वैशाली कुपिंदर बनसोडे,

* तत्त्वज्ञान विभाग, एस.जी.एम. कॉलेज, कराड, सातारा.

**सारांश :**

*धर्मानंदांची चातुर्याम धर्मावर खूप निष्ठा होती. तो सामान्य जनतेपर्यंत पोहोचावा, सार्वत्रिक व्हावा असे त्यांना वाटत असे. जैन धर्मातील इतर सिद्धांतांच्या तुलनेत त्यांनी चातुर्यामाला म्हणजेच हिंसा, असत्य, स्तेय व परिग्रह या चार गोष्टींच्या त्यागाला आयुष्यात विशेष महत्त्वाचे स्थान दिले आहे. कारण त्यांना धर्माची नैतिक बाजू अधिक महत्त्वाची वाटते. धर्मातील मूळ तत्त्वज्ञानाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन, आधुनिक काळात व्यक्ती व सामाजिक विकासासाठी खूप महत्त्वाचा आहे.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

महात्मा गांधी यांनी स्थापन केलेल्या गुजरात विद्यापीठात धर्मानंदांनी तीन वर्षे (१९२२-२५) अध्यापन केले होते. त्या दरम्यानच्या काळात त्यांचे सहकारी मुनी जिनविजयजी, पंडीत सुखलालजी आणि पंडित वेचरदासजी यांच्यामुळे धर्मानंदांचा जैन वाङ्मयाशी परिचय झाला. धर्मानंदांनी बौद्ध धर्माबरोबरच जैन धर्माचाही अभ्यास केला आहे. जैन दर्शन हे भारतीय तत्त्वज्ञानातील अवैदिक परंपरेतील दर्शनापैकी एक आहे. जैन धर्म हा भारतामध्ये श्रमण संस्कृतीचे प्रतिनिधित्त्व करतो.

जैन धर्मामध्ये चोवीस तीर्थकरांची परंपरा आहे. पार्श्वनाथ हे तेविसावे तीर्थंकर होत. बुद्धांप्रमाणेच पार्श्वनाथांच्या विचारसरणीचा धर्मानंदांवर निश्चितच परिणाम झाला होता, हे त्यांच्या आचार-विचारांतून दिसून येते. त्यांचे उत्तरायुष्य हे जैन तत्त्वज्ञानातील सिद्धांतांनी प्रेरित झालेले दिसते. धर्मानंद पार्श्वनाथ या तेविसाव्या तीर्थंकरांनी उपदेशिलेल्या धर्ममार्गाला चातुर्याम धर्म आणि बुद्धसमकाली प्रचलित, महावीरांनी उपदेशिलेल्या धर्म मार्गाला जैनधर्म असे संबोधतात. धर्मानंदांना जैन धर्मापेक्षा चातुर्याम धर्म अधिक सुलभ व श्रेयस्कर वाटतो.

चातुर्याम धर्म प्रामुख्याने चार तत्त्वांवर आधारलेला होता. हिंसा, असत्य, स्तेय व परिग्रह या चार गोष्टींचा त्याग करावा असा उपदेश ते करीत. धर्मानंदांनी 'पार्श्वनाथांपुर्वी जगात अहिंसेने ओथंबलेला असा कोणताही धर्म किंवा तत्त्वज्ञान नव्हते. इतक्या प्राचीन काळी अहिंसेला सुसंबद्ध रूप दिल्याचे हे पहिलेच उदाहरण आहे', असे नमूद केले आहे. पार्श्वनाथांचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे पूर्वी जी अहिंसा समाजापासून दूर जंगलात, रानावनात राहणाऱ्या ऋषीमुनींच्या आचरणात होती, व्यवहारात जिला फारशी किंमत नव्हती, ती अहिंसा पार्श्वनाथांनी सत्य, अस्तेय व अपरिग्रह या तीन यामांशी जोडल्याने व्यवहार्य झाली, सामाजिक झाली.

धर्मानंदांची चातुर्याम धर्मावर खूप निष्ठा होती. तो सामान्य जनतेपर्यंत पोहोचावा असे त्यांना वाटत असे. तो सार्वत्रिक व्हावा यावर त्यांचा भर होता. चातुर्यामाच्या माध्यमातून जगाचे कल्याण साधावयाचे असल्यास त्याचे शिक्षण सार्वत्रिक केले पाहिजे असे त्यांनी सूचित केले आहे. आजकाल विविध विषयांचे शिक्षण जसे दिले जाते, तसेच चातुर्यामाचेही शिक्षण दिले पाहिजे असे त्यांना वाटते. चातुर्यामामध्ये परमेश्वर संकल्पनेचे मिश्रण झाल्यास त्यापासून फायदा होण्या ऐवजी नुकसानच होईल असा इशारा धर्मानंद देतात.

म्हणून या यामांना परमेश्वर किंवा आत्म्यापासून दूरच ठेवले पाहिजे' असा त्यांचा आग्रह आहे. मानवी जीवन सुखी व्हावे याकरिता ज्या आदर्श समाज व्यवस्थेची गरज आहे, ती निर्माण करण्याचा चातुर्याम हा मार्ग आहे.

गौतम बुद्धांनी पार्श्वनाथांच्या चारही यमाचा पूर्णपणे स्वीकार केला आहे. चार याम पाळणे हीच खरी तपश्चर्या आहे; पण त्याबरोबर केवळ चार यामांनी भागावयाचे नाही, तर त्यांना समाधीची आणि प्रज्ञेची जोड दिली पाहिजे. चातुर्याम धर्म व अष्टांगिक मार्गात थोडा फरक आहे. अहिंसेच्या योगाने तादात्म्य पावणे हे दोघांचेही ध्येय आहे. परंतु, पार्श्वनाथांचे चारीही नियम निषेधात्मक आहेत आणि ते हि तपश्चर्येत मिसळून गेले आहेत. तर बुद्धांचे आठ नियम विधायक असून ते तपश्चार्येपासून मोकळे आहेत. गौतम बुद्धांनी आर्य अष्टांगिक मार्गात चातुर्यामाचा समावेश केला आहे. या नियमांव्यतिरिक्त सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती, सम्यक समाधी हे देखील अष्टांगिक मार्गाचा भाग आहेत. पार्श्वनाथांचे शिष्य चार यामांचे पालन करीत आणि उरलेला वेळ ते देहदंडनात घालवीत असत. तर बुद्धांचे शिष्य राहिलेला वेळ सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक व्यायाम, सायक स्मृती, सम्यक समाधी यांच्या अभ्यासात घालवत असत. अशाप्रकारे बुद्धांनी चार यमाचा विकास करून त्याचा आपल्या अष्टांगिक मार्गात समावेश केला आहे.

त्याबरोबरच चातुर्याम धर्म हा पतंजलीच्या यमनियमांमध्येहि परिणत झाला आहे. महात्मा गांधींच्या आश्रमधर्मामध्येही त्याचा अंगीकार आहे; असे सांगून धर्मानंद चार यामांना आधुनिक काळाशी जोडण्याचा प्रयत्न करतात. धर्मानंदांनी जैन धर्म-तत्त्वाज्ञाचा अभ्यास, संशोधन, चिकित्सा केली आहे. जैन धर्माशी सबंधित देशविरती, दिकविरती, महाव्रते, महावीरांचे ऐतिहासिकत्व, श्रमण संघांचा उगम, भारतातून ऱ्हास होण्याची कारणे अशा अनेक मुद्यांचा त्यांनी उहापोह केलेला आहे. त्यापैकी त्यांनी चातुर्यामाला म्हणजेच हिंसा, असत्य, स्तेय व परिग्रह या चार गोष्टींच्या त्यागाला आयुष्यात विशेष महत्त्वाचे स्थान दिले आहे. कारण त्यांना धर्माची नैतिक बाजू अधिक महत्त्वाची वाटते. सद्य स्थितीमध्ये सर्वसामान्यांमध्ये धर्माच्या संदर्भाने येणाऱ्या कर्मकांडाला महत्त्व आल्याचे आणि नैतिक तत्त्वांची जाणीव कमी झाल्याचे दिसते. म्हणूनच धर्मानंदांनी अधोरेखित केलेले चार यामांचे महत्त्व, कोणत्याही धर्मातील मूळ तत्त्वज्ञानाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन आधुनिक काळात व्यक्ती व सामाजिक विकासासाठी खूप महत्त्वाचा आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

➢ कोसंबी धर्मानंद; २०१२; पार्श्वनाथांचा चातुर्याम धर्म; नेहा प्रकाशन; नागपूर.

➢ कोसंबी धर्मानंद; १९३५; हिंदी संस्कृती आणि अहिंसा; ज्ञानमंडळ छापखाना; काशी.

**Cite This Article:**

**डॉ. वैशाली कुपिंदर बनसोडे, (2022)* चातुर्याम धर्म : धर्मानंद कोसंबी, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No. XI (Special Issue-II), 127-128.*